महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जा क्रः तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२४-२५/२०२४/ 3209    दिनांक : ११.०९.२०२४

12 SEP 2024

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

**विषयः ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा सर्व मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये १०० टक्के सवलती बाबत..**

संदर्भः १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि. ०८.०७.२०२४.
२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४, दि. १९.०७.२०२४.
३) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३११ दिनांक २३.०७.२०२४.
४) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/संकीर्ण/शै.वि.४/२०२४/३०७३ दि. २९.०७.२०२४.
५) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३५७ दिनांक २२.०८.२०२४.
६) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/३६८ दिनांक ०९.०९.२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयान्वये, राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणा-या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणा-या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralised Admission Process - CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) व इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणा-या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक ३ व ४ मधील अनुक्रमे संचालनालय व या विभागीय कार्यालयाच्या परिपत्रकान्वये शैक्षणिक संस्थांनी अशा योजनेसाठी पात्र असणा-या विद्यार्थीनींकडून प्रवेशावेळी शैक्षणिक शुल्क घेण्यात येऊ नये याबाबत कळविले होते.

संदर्भ क्र ५ मधील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या पत्रान्वये संस्थांनी उपरोक्त योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून देऊन, डीबीटी पोर्टलवर संस्थेत शिकत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना संबंधित योजनेसाठीचा परिपूर्ण अर्ज, ऑक्टोबरपूर्वी भरण्याबाबत कळविण्यात आलेले होते, जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही अशीदेखील सूचना देण्यात आली होती.

**तरीदेखील डीबीटी पोर्टलवर कमी अर्ज प्राप्त होत असल्याकारणाने, आपणांस खालीलप्रमाणे पुनःश्च सूचना देण्यात येत आहेत.**

१. संस्थांनी त्यांच्या संस्थेतील **ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा सर्व मुलींना (EBC/EWS/SEBC/OBC)** उपरोक्त संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णय व २ मधील शासन परिपत्रकान्वये शासनाकडून दिल्या जाणा-या **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलत** देण्यात यावी.

२. संस्थांनी प्रवेशावेळी घेण्यात येणा-या प्रशिक्षण **(Orientation Programme)** कार्यक्रमाच्या वेळी योजनेच्या लाभाबाबतची माहीती देण्यात यावी.

३. संस्थांनी, संस्थेतील वरीष्ठ प्राध्यापकांची सदर शिष्यवृत्ती योजनेकरिता विद्यार्थीनींकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज करतेवेळी येणा-या अडचणीचे निराकरण करणेसाठी नियुक्ती करावी.

४. संस्थांनी पात्र विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज (नवीन/नुतनीकरण) प्राप्त होण्यासाठी **दि.१७/०९/२०२४ ते दि.१९/०९/२०२४ या कालावधीमध्ये** संस्थास्तरावर **विशेष मोहिम राबवून**, पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेण्यात यावे. सर्व पात्र विद्यार्थ्यांना संगणक प्रयोगशाळेमध्ये एकत्र करुन, त्यांच्याकडून शिष्यवृत्ती योजनेचा ऑनलाईन अर्ज भरुन घ्यावा व त्यांना महाडीबीटी संकेतस्थळावरील ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी अचूक मार्गदर्शन करण्यासाठी संस्थेतील प्राध्यापक व शिष्यवृत्तीसंबधी कामकाज पहाणारे कर्मचारी यांना नेमावे.

५. तसेच, विभागीय कार्यालयांनी, उच्च व तंत्रशिक्षण विभागाची, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येत असलेली, **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत** लाभाचा पहिला हप्ता देण्यासाठी सुमारे रु. ३५० कोटी इतका निधी संचालनालयाकडे अर्थसंकल्पीत असून तो सदर योजनेच्या लाभाचा पहिला हप्ता संस्थांना ऑक्टोबरमध्ये प्राप्त होण्यासाठी संस्थांनी **संस्थेत शिकणा-या उपरोक्त योजनेंतर्गत डीबीटी पोर्टलवर पात्र विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज (नवीन/नुतनीकरण) भरुन संस्थांनी तपासणी (मंजूर/नामंजूर) करुन डीबीटी पोर्टलवर पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे.** उपरोक्त शिष्यवृत्ती योजनेकरिता पात्र विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज विहित कालावधीत संस्थेकडून या विभागीय कार्यालयास प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव संस्थांना सदर योजनेचा पहिला हप्ता प्राप्त न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

(मारुती जाधव)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रतः प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.